CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ ।  वर्ष : २४ वे  अंक : १९ वा  किंमत : ५ रुपये  पाने १२

यशोधन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर

आकर्षक ठेवी योजना

१ लाख रु. गुंतवा १५ महिन्यांसाठी व प्रति महिना ११०० रु. व्याज मिळवा

१ लाख रु. गुंतवा १८ महिन्यांसाठी व मिळवा १,२०,०००/- रु.

इतर ठेवी योजनासुध्दा उपलब्ध आहेत.

आमच्या शाखा

शाखा क्र. १ सोलापूर मो.नं. ८००३५८६०६० | शाखा क्र. २ अक्कलकोट मो.नं. ८१२१४२१४८४ | शाखा क्र. ३ पानमंगरूळ मो.नं. ७७३३००५४८८

# सोलापूरच्या भेटीत देवाभाऊंनी पोथडीत टाकले भरभरून दान

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झेंडा दाखवून सोलापूर ते मुंबई स्टार एअरलाईन्सच्या विमानसेवेचा थाटात शुभारंभ

**सोलापूर : नव्याने सुरू करण्यात आलेल्या सोलापूर-मुंबई विमानसेवेमुळे सोलापूर परिसरातील औद्योगिक विकासाला गती मिळेल, पर्यटनक्षेत्राला चालना मिळून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. येत्या काळात सोलापूरला नाईट लँडींग सुविधा आणि मोठे बोईंग विमानसेवा सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येतील, त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

सोलापूर-मुंबई विमानसेवेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयराव देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, माजी खासदार जयसिद्धेश्वर स्वामी, माजी आमदार नरसिंग मेंघजी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कोल्हापूर परिक्षेत्र आय जी सुनील फुलारी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मनपा आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, स्टार एअरचे संजय घोडावत, एअरपोर्ट ऑथॉरिटीच्या सहायक व्यवस्थापक अंजनी शर्मा आदी उपस्थित होते.

सोलापूरकरिता अत्यंत महत्वाचा दिवस असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शहराचा विकास करायचा असेल तर विमानसेवा गरजेची आहे.उद्योजक विमानसेवा असेल तर गुंतवणूक करतात.मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू आहे. सोलापूर जगाच्या मार्केटशी जोडले जात आहे. त्यासाठी विमानसेवा हवी. सोलापुरात विमानतळ असून विमानसेवा नव्हती. २०१४ नंतर आम्ही प्रयत्न सुरू केला. पर्यटनाच्या दृष्टीने सोलापूर महत्वाचा जिल्हा. याठिकाणी आजूबाजूला तीर्थक्षेत्रे आहेत. साखर कारखान्याच्या चिमणीची अडचण होती. कोर्ट कचेरी सुरू झाली.एक चिमणी हटवली तर विमानसेवा सुरू होऊ शकते, याचा विचार करून कोर्टात केस जिंकून चिमणी हटवली. रनवेवर कारपेटिंग केले.

(अधिक वृत्त पान २ वर..)



### सोलापूरकरांना दिवाळी भेट दिली : मोहोळ

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, सोलापूर-मुंबई विमानसेवेची नागरिकांची मागणी पूर्ण होत आहे, ही सोलापूरकरांना दिवाळीची दिलेली भेट आहे. सोलापूर हे राज्यातील दक्षिण-पश्चिमेकडील महत्वाचा जिल्हा आहे. देवभूमी म्हणून या जिल्ह्याची ओळख आहे. वस्त्रोद्योगासाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. विमानसेवेच्या माध्यमातून सोलापूर देशाच्या आर्थिक राजधानीला जोडले जात असल्याने उद्योग-शेती विकासाला चालना मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. उडान' योजनेअंतर्गत ६५ कोटी रुपये खर्च करून विमानतळ टर्मिनल इमारत उभारण्यात आली आहे. सोलापूर-मुंबई विमानसेवेसाठी आर्थिक तूट भरून काढण्यासाठी राज्य शासनाने हमी घेतल्याने ही विमानसेवा सुरू होत आहे. येत्या काळात हैद्राबाद आणि तिरुपतीसारख्या शहरांना जोडणारी विमानसेवा सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### विमानसेवेमुळे औद्योगिक विकासाला गती आणि पर्यटनाला चालना : मुख्यमंत्री

**फडणवीसांनी काय काय दिले...**

- येत्या काळात नाईट लँडींग सुविधा निर्माण करणार
- मोठे बोईंग विमानसेवा सुरू करण्याचे प्रयत्न
- आता चांगले आयटी पार्कही लवकरच सुरू करू
- दररोज पाणी देण्यासाठी १ हजार कोटी देणार,त्याचेही प्लॅनिंग केलं असून दोन तीन वर्षे लागतील
- सोलापूर दक्षिण भारताचे प्रवेशद्वार आहे,तीर्थक्षेत्रे जोडली जाणार
- येत्या काळात हैद्राबाद आणि तिरुपतीसारख्या शहरांना जोडणारी विमानसेवा सुरू करणार

### ८७२ कोटी रुपयाचे शहराच्या अंतर्गत जलवाहिनीचे काम होणार


पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापूरचे नागरिक मुंबईसाठी विमानसेवेसाठी अनेक वर्षापासून प्रतिक्षा करीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे या विमानसेवेला प्रारंभ होत आहे. नुकत्याच झालेल्या महापुराच्या संकटाच्यावेळी प्रशासनाने चांगली कामगिरी करून जिवीतहानी होऊ दिली नाही. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. त्यामुळे शासन आपल्या पाठीशी असल्याचा विश्वास शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पूरग्रस्ताच्या घरी दिवाळी साजरी होण्यासाठी आवश्यक साहित्य देण्यात येत आहे. ८७२ कोटी रुपयाचे शहराच्या अंतर्गत जलवाहिनीचे काम होणार आहे, असेही गोरे म्हणाले. सोलापूर-तिरुपती विमानसेवा लवकर सुरू करावी आणि शहर विकास आराखड्याचे काम लवकर व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शहरात होत असलेल्या सुधारणांमुळे औद्योगिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पतीचा खून पतीला पोलीस कोठडी

**सोलापूर :** चारित्र्याच्या संशयावरून पतीचा चाकूने भोसकून खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या सुहास तुकाराम सिद्धगणेश (वय ४० राहणार तळेहिप्परगा ता.उत्तर सोलापूर) याला ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने बुधवारी दिला. मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास आरोपी सिद्धगणेश हा त्याची पती यशोदा सिद्धगणेश (वय ३५ रा. बुधवार पेठ रमाबाई आंबेडकर नगर) हिचा चाकूने सपासप वार करून खून केला होता.याप्रकरणी मयत यशोदा हिची मावशी अन्नपूर्णा बाळशंकर यांनी जोडभावी पेठ पोलिसात फिर्याद दाखल केली होती.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जनतेचं प्रेम कमी नाही होणार

संगम श्री डे
289-93-247

संगम श्री नाईट
120-34-257

कल्याण
568-95-258


मुंबई
167-47-115

## 'त्यांना एक फूल द्या आणि गेट वेल सून' म्हणा

### पूर सरकारने आणला म्हणणाऱ्यांना फडणवीसांचा टोला

**सोलापूर/प्रतिनिधी**





राज्यात झालेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे आणि नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यावर आम्ही आतापर्यंतच्या इतिहासात पूरग्रस्तांसाठी तब्बल ३३ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. पूरग्रस्तांना सावरण्यासाठी राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे. असे असताना मात्र काही विरोधक या विषयावरही राजकारण करत आहेत, कोणी म्हणतं हा पूर राज्य सरकारनेच आणला आहे. असे बोलणारे लोक मानसिक दृष्ट्या अस्वस्थ आहेत, अशा लोकांना एक फूल द्या आणि गेट वेल सून' म्हणा, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खा. प्रणिती शिंदे यांचे नाव न घेता लगावला.

काही दिवसांपूर्वी खासदार शिंदे यांनी सोलापूर आणि जिल्ह्यातील महापूर नैसर्गिक नव्हता, तो शासनाने आणला होता असे विधान केले होते. या विधानावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले. ते म्हणाले, महापुरात अडकलेल्या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. नुकसानीची भरपाई आणि पुनर्वसनासाठी शासनाने मोठे पॅकेज दिले आहे. मात्र, यावरही काही जण राजकारण करतात. राजकारणाचा किडा अनेकांच्या डोक्यात शिरला आहे. सोलापूरमध्ये मला असे स्टेटमेंट पाहायला मिळाले की हा पूर राज्य सरकारने आणला आहे. हे विधान म्हणजे एक प्रकारे मानसिकतेचे लक्षण आहे. राज्य सरकारने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जे प्रयत्न सुरू केले आहेत, ते विरोधकांनीही पाहावेत. त्यांच्याकडे लक्ष देऊन नये त्यांना एक फूल द्या आणि गेट वेल सून' म्हणा. या भाषणाने उपस्थित प्रेक्षकांनी जोरदार प्रतिसाद दिला. कार्यक्रमात गेट वेल सून' या वाक्याने हास्याचे वातावरण निर्माण झाले.

## अक्कलकोट रोडवर अपघात; तरुण ठार

**अक्कलकोट :** अक्कलकोट मार्गावरील विराट मॉल जवळ अपघातामध्ये दुचाकीवरील ३१ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाला. हा अपघात बुधवारी दुपारच्या सुमारास घडला. चंदन देविदास कोत्तापल्ली (वय ३१ रा.आदर्शनगर एमआयडीसी रोड सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो एका खाजगी कंपनीत कामाला होता. बुधवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास तो सोलापूर ते अक्कलकोटच्या दिशेने दुचाकीवरून निघाला होता.विराट मॉल समोरील ब्रिजवर तो रस्ते अपघातामध्ये बेशुद्ध झाल होता. त्याला शासकिय रुग्णालयात नागार्जुन उदगिरी (भाऊजी) यांनी दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.



मयत कोत्तापल्ली

## मृत्युदंडाच्या शिक्षेची पद्धत का बदलत नाही? सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला सवाल...

### न्यायालयाने मृत्युदंड देण्याच्या पद्धतीवर सरकारला सुनावले!



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मृत्युदंड देण्याच्या पद्धतीवर सरकारला कठोर शब्दांत सुनावले आहे. न्यायालयाने विचारले की, ''सरकार काळानुसार बदल स्वीकारायला तयार का नाही?'' ही टिप्पणी त्या जनहित याचिकेवर सुनावणीदरम्यान करण्यात आली, ज्यात फाशीऐवजी घातक इंजेक्शन, फायरिंग स्क्वाड, इलेक्ट्रिक चेअर किंवा गॅस चेंबर यांसारख्या आधुनिक आणि ''मानवीय'' पद्धतींचा विचार करण्याची मागणी करण्यात आली होती.

माध्यमातील एका वृत्तानुसार, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी म्हटले, की ''समस्या ही आहे की, सरकार विकसित होण्यासाठी तयार नाही. फाशी ही खूप जुनी पद्धत आहे. काळ बदलला आहे, पण शासनाची मानसिकता बदललेली नाही.''

**याचिकाकर्त्यांची मागणी**

याचिकाकर्त्यांचे वकील ऋषी मल्होत्रा यांनी न्यायालयात मांडलं की, ''किमान दोषी कैद्याला पर्याय तरी द्या, फाशी हवी की घातक इंजेक्शन? घातक इंजेक्शन जलद, वेदनारहित आणि मानवी आहे, तर फाशी ही क्रूर आणि दीर्घकाळ चालणारी आहे. भारतीय सेनेत देखील दोषी अधिकाऱ्यांना मृत्यूच्या पद्धतीचा पर्याय दिला जातो.''

**सरकारची भूमिका...**

सरकारतर्फे वरिष्ठ वकील सोनिया माथूर यांनी सांगितलं की, ''कैद्यांना मृत्यूच्या पद्धतीचा पर्याय देणे, हे नीतिगत निर्णयाचे प्रकरण आहे. अशा बदलासाठी अनेक प्रशासकीय आणि कायदेशीर निर्णय घ्यावे लागतील. सध्याच्या परिस्थितीत घातक इंजेक्शनसारखा पर्याय देणे शक्य नाही.''

**११ नोव्हेंबर रोजी पुढील सुनावणी...**

या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ नोव्हेंबरला होणार आहे. न्यायालयाने संकेत दिला की, ते मृत्युदंडाच्या मानवीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पुनरावलोकन करण्याच्या बाजूने आहे.

# भावाने बहिणीच्या न्यायासाठी मुख्यमंत्र्यांच्या देखत फोडला टाहो





**सोलापूर/प्रतिनिधी**

**न्यायालयात आणि मायबाप सरकारकडे न्याय मिळाला नाही तर प्रजेने कोणाकडे धाव घ्यायची.शेवटी अशा अन्यायग्रस्त माणसांकडे टाहो फोडणे किंवा आक्रोश करणे याशिवाय पर्याय राहिलेला नाही.त्याचा अनुभव बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोलापूरच्या दौऱ्यात आला.**

### ✔ न्याय द्या, न्याय द्या... फडणवीस यांच्या कार्यक्रमात तरुणाचा गोंधळ; लेकीसाठी आईच्याही डोळ्यात अश्रू

झाले असे की,सोलापूर-मुंबई विमानसेवेचा शुभारंभ करण्यासाठी फडणवीस हे सोलापूरच्या दौऱ्यावर आले आहे.शुभारंभ झाल्यानंतर विमानतळाच्या प्रांगणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.फडणवीस व मान्यवर व्यासपीठावर स्थानापन्न झाले.प्रस्तावना झाल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मनोगत सुरू होते तेव्हा एक तरूए अचानक उभा राहिला आणि न्याय द्या..न्याय द्या... असा टाहो फोडत कार्यक्रमात घुसला..त्याच्या आक्रोशाने कार्यक्रमात एकच धांदल उडाली. तत्काळ पोलीस त्या जागेवर येवून त्या तरूणाला ताब्यात घेतले.

आपल्या बहिणीच्या मृत्यूप्रकरणात पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने आई आणि मुलगा दोघेही कार्यक्रम स्थळी येऊन न्यायाची मागणी केली.

गोरे यांचे भाषण सुरू असताना अचाकन एक तरुण, मला न्याय द्या, न्याय द्या.. असे म्हणत कार्यक्रमात घोषणाबाजी करताना दिसून आला. त्यावेळी, पोलिसांनी तात्काळ तरुणाला ताब्यात घेत बाहेर काढले. मात्र, या तरुणासोबत त्याची आई देखील न्यायाची मागणी करण्यासाठी आल्याचे दिसून आले. पोलिसांनी माय-लेकास पोलीस जीपमध्ये घालून ठाण्यात नेले.

दरम्यान, पंकज मारुती जिंदम असे कार्यक्रमात घोषणाबाजी करणाऱ्या तरुणाचे नाव असून तो त्याच्या आईसह कार्यक्रमस्थळी पोहोचला होता. पंकज याच्या बहिणीचा १५ ऑगस्ट २०२५ रोजी मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर पोलिसांच्या नोंद नुसार ही आत्महत्या असल्याचे नमूद आहे. मात्र, सासरच्या मंडळींने छळ करुन तिची हत्या केल्याचा आरोप तरुणाचा आणि त्याच्या आईचा आहे. त्यामुळे, आपल्याला न्याय मिळाव, याच मागणीसाठी हा तरुण फडणवीस यांच्याकडे दाद मागण्यासाठी, भेटीसाठी आला होता. मात्र, तिथपर्यंत पोहोचता येत नसल्याचे लक्षात येताच त्याने न्याय द्या, न्याय द्या.. अशी घोषणाबाजी केली.

CMYK